# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ ) ( Formerly Solapur University)

NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA-2.62)

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in

ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०


जावक क्र. : पुअहोसोविसो/२०२४/ ४२४ दि. - 4 APR 2024

## अत्यंत महत्वाचे परिपत्रक क्र. २३

सर्व प्राचार्य / संचालक, संलग्नित महाविद्यालय / संस्था यांना कळविण्यात येते की, दिनांक ०५ एप्रिल २०२४ पासून प्रस्तुत विद्यापीठाच्या पारंपारिक परीक्षा सुरु होणार आहेत. त्याअनुषंगाने खालील महत्वपूर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन विद्यापीठास सहकार्य करावे. ही विनंती.

१. Flying Scod, External Examiner and Assessment करीता सर्व शिक्षकांना प्राचार्य महोदयांनी रिलीव्ह करावे. जेणेकरुन परीक्षेचे निकाल निर्धारित वेळेतच प्रसिध्द करणे शक्य होईल. याकरीता आवश्यक ते सहकार्य महाविद्यालयांनी करावे.

२. ज्या महाविद्यालयांना नव्याने परीक्षा केंद्रे देण्यात आलेली आहेत अशा महाविद्यालयांनी परीक्षेविषयीचे नियोजन काटेकारेपणे करावे.

३. पारंपारिक अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाचे परीक्षा केंद्र संबंधित महाविद्यालय असून व्दितीय व तृतीय वर्षाचे परीक्षा केंद्र हे त्या त्या शहरातील अंन्य महाविद्यालय असणार आहेत. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

४. प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्याकरीता स्ट्रॉंग रुम असणे आवश्यकच आहे. तसेच स्ट्रॉंग रुममध्ये प्रश्नपत्रिका डाऊनलोड करीत असताना आवश्यक ती सर्व खबरदारी महाविद्यालयांनी घ्यावी.

५. प्रश्नपत्रिकेचे झेरॉक्स महाविद्यालयाच्या स्ट्रॉंग रुममध्येच करावे. कोणत्याही परिस्थितीमध्ये ते अंन्य ठिकाणी करण्यात येऊ नये. तसेच स्ट्रॉंग रुममध्ये आवश्यक ते बॅकअप व जनरेटरच्या व्यवस्थेची पूर्वतयारी केलेली असावी.

६. विद्यार्थी परीक्षा हॉलमध्ये मोबाईल व अंन्य इलेक्ट्रॉनिक गॅझेट कोणत्याही परिस्थितीमध्ये नेणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी.

७. हॉलतिकीट व सीट नंबर शिवाय विद्यार्थी कोणत्याही परिस्थितीमध्ये परीक्षेस बसता कामा नये.

८. महाविद्यालयांकडून अंतर्गत गुण वेळेतच प्राप्त होणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी दंड भरुन उशिरा गुण सादर करणे अशा बाबी करु नयेत.

९. विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेवरील बैठक क्रमांक, पेपर क्रमांक, पेपर कोड, तारीख इत्यादी बाबतची माहिती व्यवस्थित व अचूक लिहावी. ते पर्यवेक्षक यांनी काटेकोरपणे तपासावे. तसेच बैठक क्रमांकाकरीता असलेले ओएमआर शीटमधील गोल त्या त्या क्रमांकानुसार डार्क करावेत. याची दक्षता घ्यावी.

१०. उपस्थिती व अनुपस्थिती यादी अचूकपणे भरावी.

११. परीक्षा झाल्यानंतर लिहिलेल्या उत्तरपत्रिका तात्काळ कॅपच्या मार्गदर्शक सूचनेनुसार त्या त्या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर जमा कराव्यात.

१२. विद्यापीठ परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आपल्या स्तरावरुन वरीलप्रमाणे आवश्यक ते सर्व सहकार्य करावे. ही विनंती.

04/04/24

डॉ. श्रीकांत ग. अंधारे
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत -१) मा. कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२) मा. प्र. कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ